सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/०८९ दिनांक : १४/०८/२०२५.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांच्या जिल्हानिहाय वार्षिक नियोजन सभेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थामधून नियुक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांची शैक्षणिक वर्ष २०२५–२६ ची वार्षिक नियोजन सभा पुढीलप्रमाणे जिल्हानिहाय आयोजित करण्यात आली आहे.

| दिनांक | जिल्हा/विभाग | नाव नोंदणी वेळ | सभा वेळ | महाविद्यालये | स्थळ |
|---|---|---|---|---|---|
| मंगळवार, दिनांक १९ ऑगस्ट, २०२५ | पुणे जिल्हा (शहर व ग्रामीण) | सकाळी १०.३० ते सकाळी ११.०० | सकाळी ११.०० ते दुपारी ०१.३० | पुणे जिल्हयातील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था | **पर्यावरणशास्त्र विभाग सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे** |
| बुधवार, दिनांक २० ऑगस्ट, २०२५ | नाशिक | दुपारी ०१.३० ते दुपारी ०२.०० | दुपारी ०२.०० ते सायं. ०४.०० | नाशिक जिल्हयातील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था | के.आर.टी. आर्टस्, बी.एच. कॉमर्स ॲण्ड ए.एम.सायन्स कॉलेज (के.टी.एच.एम) नाशिक **(म.वि.प्र.चे कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृह)** |
| शनिवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२५ | अहिल्यानगर | दुपारी ०१.३० ते दुपारी ०२.०० | दुपारी ०२.०० ते सायं. ०४.०० | अहिल्यानगर जिल्हयातील सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था | न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, लालटाकी रोड, अहिल्यानगर **(राजर्षी शाहू सभागृह)** |

सदर सभेपुढील विषय :

१. विद्यार्थी अपघात विमा योजना मार्गदर्शन.
२. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील विविध योजना व उपक्रमांचे मार्गदर्शन व वार्षिक नियोजन करणे.
३. विविध योजना व उपक्रमांचे ऑनलाईन पद्धतीने अर्ज, अहवाल भरण्याबाबत आणि योजनेबाबत येत असणाऱ्या अडचणीबाबत मार्गदर्शन करणे.
४. विभागीय/जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे आयोजनाबाबत.
५. आयत्या वेळचे विषय.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील फक्त विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) यांना सदर सभेस वरीलप्रमाणे जिल्हानिहाय विहित दिनांकास व वेळेत उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे.

तसेच विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनीही आपला प्रतिनिधी परस्पर पाठवू नये याबाबतही आपण लक्ष घालावे.

कळावे, ही विनंती.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक (अतिरिक्त कार्यभार), विद्यार्थी विकास मंडळ